# शिदोरी

## (निवडक हदीसींचा संग्रह)

लेखक
मो. शाह वलीउल्लाह मुहद्दीस

भाषांतर
प्रा. अब्दुर्रहमान शेख

*''अल्लाहच्या नावाने, जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे.''*

# दोन शब्द

शाह वलीउल्लाह मुहद्दीस, देहलवी (रह.) यांचे हे संकलन कार्य आहे. त्यात चाळीस हदीसकथने आहेत. या हदीसचे निवेदनकर्ता एकूण २४ आहेत. त्यांचा उल्लेख शाह वलीउल्लाह यांनी केलेला आहे. जणू काही २४ निवेदनकर्त्यांमार्फत पैगंबर मुहम्मद (स.) यांचे हे हदीसकथन शाह वलीउल्लाह यांच्यापर्यंत पोहचले आहेत. निवेदनकर्ता माननीय अली (रजि.) हे आहेत.

सर्वसमावेशक आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राला मार्गदर्शक अशी ही हदीसकथने आहेत. अर्थपूर्ण आणि खुलासेवार वर्णन त्यात आहे. कुठे कुठे जास्त खुलासासुध्दा दिला आहे. अल्लाह या लहानशा प्रयत्नाला स्वीकृती देवो आणि लोकांना यापासून जास्तीत जास्त फायदा होत जावो! *(आमीन)*

**– मुहम्मद फारूख खान**

–o–o–o–

**माननीय अली (रजि.) यांच निवेदन आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे,**

## १) वार्ता म्हणजे पाहाणे नाही.

वार्ता अथवा बातमी डोळ्याने पाहण्यासारखे नाही. अल्लाहने आदरणीय मूसा (अ.) यांना त्यांच्या अनुयायांनी वासरूविषयी जे काही केले त्याची खबर दिली होती. परंतु त्याने प्रभावित होऊन आदरणीय मूसा (अ.) यांनी तौरातचे शिलालेख फेकून दिले नाहीत. परंतु जेव्हा ते आपल्या अनुयायी समाजात आले आणि स्वत: आपल्या डोळ्यांनी आपल्या अनुयायींच्या कर्तृत्वाला पाहिले तेव्हा रागात येऊन त्यांनी तौरातचे शिलालेख फेकून दिले आणि निराश झाले होते.

अर्थ होतो की डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहाणे वेगळे आहे बातमी, खबर मिळण्यापेक्षा! बातमीची त्याच्याशी तुलना होऊच शकत नाही. पाहण्याने आणि निरीक्षणाने मन जसे प्रभावित होते ते वार्ता ऐकूण होत नाही. मग मनुष्याला त्या बातमीवर कितीही विश्वास का असेना. पैगंबर (स.) यांनी एक उदाहरण देऊन समजावून सांगितले, पाहा, आदरणीय मूसा (अ.) यांना अल्लाहने खबर दिली होती की त्यांच्या अनुयायांनी त्यांच्या पश्चात एका वासराला त्यांचे दैवत (उपास्य) बनवले आहे. परंतु आदरणीय मूसा (अ.) यांच्यावर तो प्रभाव पडला नाही की त्यांनी रागाने तौरातचे शिलालेख फेकून द्यावेत. जेव्हा त्यांनी प्रत्यक्ष

आपल्या डोळ्यांनी अनुयायांची करतूत पाहिली तेव्हा त्यांना राग आला आणि त्यांनी तौरातचे शिलालेख फेकून दिले. ते तर लोकांसाठी मार्गदर्शक ग्रंथ घेऊन आले आणि लोक मात्र अत्याचारी आणि मार्गभ्रष्ट बनले आहेत.

**२) युध्द एक चाल आहे**

युध्दात यशस्वी होण्यासाठी आणि युध्द जिंकण्यासाठी आवश्यक आहे की युध्दाच्या युक्त्या आणि गणिमीकाव्याने शत्रू सचेत कधीही होऊ नये.

**३) मुस्लिम मुस्लिमाचा आरसा आहे.**

एक मुस्लिम आरशासारखा दुसऱ्या भावाच्या कमतरतेला दाखवू शकतो, परंतु त्यामागे त्याचे भले करणे हाच एकमात्र उद्देश असणे आवश्यक आहे. उद्देश फक्त सुधारणेचा आणि भलाईचाच असला पाहिजे. त्याची बदनामी करण्याचा उद्देश मुळीच असू नये.

**४) ज्याच्याकडे सल्ला मागितला जाईल तो इमानदारीने निर्णय घेणारा असावा.**

म्हणजे त्याने सत्य आणि फायदेशीर सल्ला द्यावा आणि सल्ला घेणाऱ्याच्या गुपिताला कुणा दुसऱ्यापुढे उघडे करू नये. कारण हा एक प्रकारचा विश्वासघात आहे ज्याची अपेक्षा एका मुस्लिमांकडून केली जाऊ शकत नाही.

**५) सदाचाराचे आणि भलाईचे काम करण्यास मार्गदर्शन करणारा असा आहे जसा भलाईचे काम करणारा.**

हेसुध्दा एक सदाचार आहे की कुणाला चांगुलपणाचे काम दाखविले जावे. जर त्याच्या मार्गदर्शनाने एखाद्याला सदाचार करण्याची प्रेरणा मिळते तर त्या मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तीलासुध्दा त्या सदाचाराचा भागीदार समजला जाईल. जणू काही त्यानेसुध्दा तो सदाचार केला आहे. कारण त्याचे मार्गदर्शन लाभले नसते तर तो सदाचार घडलाच नसता.

**६) आवश्यकतेसाठी आणि गरजेसाठी गुप्तपणे मदत घेण्याचा प्रयत्न करावा.**

कारण एखाद्या कामाची पूर्तता गुप्तपणे केली पाहिजे. त्याची चर्चा करण्यात बरेवाईट होण्याची शक्यता दाट असते. आपल्या शरीराकडे पाहिले तर आपणास कळून येते की अत्यंत गुप्तपणे त्याची वाढ होत जाते. त्याच्यासाठी शरीर काही मोठी चर्चा घडवून आणत नाही की डांगोरा पिटत नाही.

**७) नरकाग्नीपासून आपला बचाव करा खजुरीचा एक टुकडा देऊन का होईना.**

अर्थात संख्येला येथे महत्त्व नाही तर तुमच्या संकल्पनेला महत्त्व आहे. जर तुमच्याजवळ दान देण्यासाठी फक्त खजुरीचा एक टुकडाच आहे आणि अशा स्थितीत तुम्ही

त्याला दान करून दाखवून देता की अल्लाहचे भय तुमच्या मनात आहे. अल्लाहच्या दासांसाठी तुमच्या मनात सहानुभूती आहे.

**८) जग श्रध्दावंतांसाठी कारागृह आहे आणि विद्रोहीं (अनेकेश्वरवादी) साठी स्वर्ग आहे.**

श्रध्दावंताला परलोक सफलतेचा ध्यास व आस लागून राहते. तो अल्लाहजवळ आपली मुक्ती प्राप्त करण्याची आणि स्वर्गप्राप्ती करण्याची इच्छा बाळगून असतो. त्यांच्या तुलनेत त्याला जग मूल्यहीन वाटते. त्यामुळे तो लौकिक संकटापासून घाबरत नाही. ज्याला जगाची प्राप्तीच सर्व काही आहे, तो लौकिक संकटांपासून दु:खी आणि निराश बनतो. त्या श्रध्दावंताला माहीत असते की जगातील संकटे आणि अडथळे शाश्वत नाहीत. एके दिवशी त्याला यांच्यापासून सुटका मिळणारच आहे. म्हणून श्रध्दावंत अल्लाहने घालून दिलेल्या मर्यादेच्या आत राहूनच आपले जीवन कंठित राहतो.

**९) लज्जा चांगुलपणा आहे.**

मनुष्याजवळ जर स्वभावत: लज्जा आहे तर त्याच्या हातून कुकर्माचे आणि बिघाडाचे कोणतेच काम पार पाडले जात नाही. परंतु एखादा माणूस निर्लज्ज असेल तर सांगता येत नाही की तो कधी काही कुकर्म करून बसेल.

**१०) श्रध्दावंताचे वचन असे असते जसे त्याला हातात धरून ठेवावे.**

अर्थात श्रध्दावंत आपल्या वचनाचा पक्का असतो. तो कधीच वचन भंग करीत नाही. त्याच्या वचनावर पूर्ण विश्वास ठेवला जाऊ शकतो. उदा. तो तुम्हाला एखादी वस्तू देण्याचे वचन देतो तेव्हा तुम्ही समजून असा की ती वस्तू तुमच्या हातात आहे. वचनाविरुध्द घडूच शकत नाही.

**११) श्रध्दावंताला हे शक्य नाही की आपल्या बंधुला त्याने तीन दिवसांपेक्षा जास्त काळ मुकावे.**

अर्थात मुस्लिमांचे आपापसांतील व्यवहार शत्रुत्वाचे नसावेत. जर त्याने आपल्या भावाला काही कारणाने आणि नाराजीने दूर ठेवले असेल तर त्याला ठाऊक असावे की इस्लाममध्ये अशा प्रकारे नातेसंबंध तोडणे योग्य नाही. त्याला तीन दिवसांच्या आत समेट घडवावाच लागेल. वैयक्तिक फायद्यापेक्षा सामाजिक फायदे अत्यंत महत्त्वाचे आहेत. धार्मिक उद्देशपूर्ती ही सामूहिक एकतेतूनच प्राप्त होते. म्हणून प्रत्येक मुस्लिमाचे हे कर्तव्य आहे की त्याने असे काही कृत्य करू नये की ज्यामुळे सामुदायिकतेला आणि सामुदायिक व्यवस्थेला बाधा पोहचेल. याला समजण्यासाठी कुरआन आणि हदीसच्या प्रकाशात सामुदायिक व्यवस्था स्थापन करणे आवश्यक ठरते.

**१२) जो आमच्याशी विश्वासघात करील आणि धोका देईल तो आमच्या-**

पैकी नाही.

अर्थात जो कोणी वैयक्तिक फायद्यासाठी विश्वासघात करून धोका देतो आणि मुस्लिम समाजाची भलाई करण्याची जबाबदारी त्याच्यावर आहे ती विसरून जातो, त्याने समजून असावे की तो मुस्लिम समाजाशी संबंध तोडून आहे. हे एक भयानक कृत्य आहे. याची जाण होणे आवश्यक आहे.

एकदा पैगंबर मुहम्मद (स.) बाजारात गेले असता तिथे एक माणूस गहू विकत होता. गव्हाचा ढीग पुढे होता. त्यांनी त्या गव्हाच्या ढिगात हात घातला तर कळले की आतील गहू भिजलेले आहेत. पैगंबरांनी कारण विचारले असता त्याने सांगितले की मी मुद्दाम गहू भिजविले नाही. पैगंबरांनी विचारले की भिजलेले गहू वर काढून का ठेवले नाही? या ठिकाणी पैगंबरांनी वरील हदीस कथन केली आहे.

**१३) जे थोडे आहे परंतु त्याने गरज भागते तर ते श्रेष्ठ आहे त्या जास्तीपेक्षा ज्याने मनुष्य निष्काळजी बनून राहातो.**

श्रीमंत लोक आपल्या भरपूर धनसंपत्तीमुळे सत्याविषयी निष्काळजी आणि गाफील राहातात. अशा विपुल धनसंपत्तीपेक्षा ती थोडीशी संपत्ती अधिक चांगली आहे ज्यामुळे मनुष्याच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण होतात आणि त्या थोड्याशा संपत्तीमुळे मनुष्य गफलतीत राहात नाही व निष्काळजी बनत नाही. यावरून जगातील इतर वस्तूंचीसुध्दा तुलना केली जाऊ शकते की कोणत्या स्थितीत कोणती वस्तू अधिक चांगली आहे आणि कोणत्या स्थितीत अधिक चांगली असू शकत नाही.

**१४) आपल्या दिलेल्या वस्तूला परत घेणारा असा आहे की कुणी उलटी करून तिला चाटावे.**

दिलेल्या वस्तूला पुन्हा घेणे अत्यंत वाईट गोष्ट आहे. ज्याच्या विचारानेसुध्दा मनुष्याला घृणा होते. असे कृत्य तोच मनुष्य करू शकतो जो अत्यंत नीच आहे. एके ठिकाणी हदीसमध्ये आले आहे की दिलेल्या वस्तूला परत घेणारा मनुष्य कुत्रा आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी माननीय उमर (रजि.) यांना दिलेला घोडा त्याची किंमत चुकवून परत घेण्याससुध्दा मनाई केली होती. कारण अशा स्थितीतसुध्दा दिलेली वस्तू परत घेण्यासारखेच आहे. यावरून कळते की इस्लाम व्यवहारात सतर्कता ठेवतो.

**१५) संकट आणि विपत्ती बोलण्याने येते.**

अर्थात जिव्हेचा चुकीचा वापर संकटांना आणि आपत्तींना आमंत्रण देतो. तोंड बंद ठेवणारा माणूस हजारो संकटांपासून आणि आपत्तींपासून सुरक्षित राहातो. कितीतरी चांगले संबंध जिभेला ताब्यात न ठेवल्याने बिघडतात आणि मनुष्य संकटात सापडतो. जिभेची धार तलवारीच्या धारेपेक्षासुध्दा कित्येक पटीने जास्त आहे. जिभेच्या अनुचित वापरामुळे कधीकधी

मनात खोलवर जखमा होतात ज्यांना कधीही भरून काढले जाऊ शकत नाही. म्हणून आवश्यक आहे की जिभेचा वापर सावधान राहूनच करावा.

**१६) लोक असे आहेत जसे कंगव्याचे दात आहेत.**

स्वाभाविकत: लोकांची स्थिती अशी आहे की त्यांचे सामाजिक संबंध असे असावेत जसे एका कंगव्याच्या दातांचे परस्परावलंबित्व असते. कंगव्याचे दात चांगले आणि स्वच्छ राहून एक दुसऱ्याला साथ देतात. जर कंगई (कंगवा) चे काही दात पडलेले असतील किंवा खराब असतील तर संपूर्ण कंगवा खराब ठरतो. आदर्श समाज तोच आहे ज्याचे सदस्य सामाजिक संबंधांची जाण ठेवतात आणि त्यासाठी प्रयत्नशील असतात.

**१७) खरी श्रीमंती मनाची श्रीमंती आहे.**

मनुष्याचे मन मोठे नसेल तर कितीही संपत्ती त्याच्याकडे असली तरी ती बेकार आहे. परंतु मनुष्याचे मन संतुष्ट आहे तर बाह्यत: तो श्रीमंत जरी नसला तरी काही बिघडत नाही.

**१८) भाग्यशाली आहेत ते लोक जे दुसऱ्याच्या स्थितीपासून धडा घेतात.**

वाईटांच्या वाईट परिणामांपासून जो कोणी धडा घेत नसेल आणि वाईट कृत्यापासून परावृत्त होत नाहीत अशा लोकांना शेवटी अद्दल घडते आणि त्यांना धडा मिळतो.

**१९) काही वक्तव्ये विवेकनिष्ठ असतात आणि काही मात्र फक्त भाषणबाजी असतात.**

अशी व्यक्तव्ये, भाषणे आणि काव्य विवेकशील असतात, ती प्रशंसेलायक आहेत. काही भाषणे बुध्दीविवेकपूर्ण असतात आणि प्रभावी असतात. परंतु फक्त तीच भाषणे व प्रवचने लोक स्वीकारतात जी सत्यासाठी असतात. असत्यासाठी असलेली प्रवचने मात्र विनाशकारीच सिध्द होतात.

**२०) राजाने द्वेषाकडे दुर्लक्ष करणे व क्षमाशीलतेने काम घेणे त्याच्या शासनाच्या स्थिरतेचे लक्षण आहे.**

राजाचे कर्तव्य आहे की जनतेशी सहानुभूतीचा व्यवहार ठेवावा. अशा स्थितीत तो प्रजेशी सक्तीने वागणार नाही तर यथावकाश तो क्षमाशीलतेने काम करील. प्रजासुध्दा त्यामुळे प्रभावित होईल आणि शासनाला आपले सहयोग देत राहील. यामुळे शासन मजबूत होईल आणि स्थिर राहील. याविरुध्द जर जनतेत शासनाविषयी बेचैनी आणि राग असेल तर हे शासनासाठी शुभ लक्षण मुळीच नाही.

**२१) मनुष्य त्याच्या बरोबर राहातो ज्याच्याशी तो प्रेम करतो.**

प्रेम एक मौलिक महत्त्वाची भावना आहे. ज्या व्यक्तीशी अथवा समाजाशी मनुष्य प्रेम करतो तो त्याच्या बरोबर राहातो. प्रेमात विश्वास आहे. दुसरे सर्व द्वितीय स्थानावर

आहेत. खऱ्या प्रेमाची निकड आहे की मनुष्याच्या वागणुकीतून ते प्रदर्शित व्हावे. त्याच्या प्रियतम व्यक्तीला आवडणार नाही असे कृत्य त्याच्या हातून कधीच घडत नाही, किंवा त्या समाजाच्या फायद्याविरुध्द कृत्य ती व्यक्ती कधीच करीत नाही ज्या समाजाशी तो प्रेम करतो. ज्या व्यक्तीबरोबर, समाजाबरोबर अथवा अनुयायींबरोबर एखाद्या माणसाचा उल्लेख होतो त्यांच्या बरोबरीने त्या माणासाचा शेवट होतो. म्हणून मनुष्याने प्रथमत: निश्चित करावे की तो कुणाबरोबर मनाचे संबंध तथा प्रेम जोडत आहे. कारण त्याला आपल्या शेवटाचा अंदाज येतो. यामुळे तो धोक्यात किंवा संकटात सापडू शकत नाही.

**२२) तो मनुष्य सर्वनाशापासून वाचला जो आपली योग्यता ओळखून बसतो.**

मनुष्याचा विनाशाच्या खाईत कडेलोट तेव्हाच होतो, जेव्हा त्याची योग्यता आणि किमतीचा अंदाज तो न घेता जीवन कंठत असतो. अशा स्थितीत तो जीवनभर न्यूनगंडात वावरतो आणि जीवनात स्वत:ला इतरांपुढे कमी समजून असतो. त्याला न शोभणारे हे वर्तन आहे. अशा प्रकारे तो स्वत:ला नीचतेत पाहातो. जगातील इतर कोणतीच शक्ती अशा व्यक्तीला विनाशाच्या खाईत कडेलोट होण्यापासून वाचवू शकत नाही. तो निर्जीवासारखा राहून आपल्या जबाबदारी आणि कर्तव्यांना विसरतो. म्हणून स्पष्ट आहे की अशा व्यक्तीचा सर्वनाश ठरलेलाच आहे.

**२३) मूल स्त्रीच्या हिश्यात येईल आणि बलत्कारीच्या नशिबी दगड येतील.**

म्हणजे बलात्कारी खरा तर दुराचारी असतो. दुराचाराच्या बदल्यात त्याला मूल मिळत नाही तर शिक्षेत त्याला दगड़ खावे लागतात.

**२४) वरचा हात खालच्या हातापेक्षा उत्तम आहे.**

यात खरे श्रेष्ठत्व आहे की मनुष्याने देणारा बनावे, घेणारा नव्हे.

**२५) तो मनुष्य अल्लाहचा कृतज्ञ होऊ शकत नाही जो लोकांची कृतज्ञता व्यक्त करत नाही.**

जेव्हा एखादा मनुष्य लोकांच्या उपकारासाठी कृतज्ञता व्यक्त न करता लोकांशी कृतघ्न बनून राहतो. अशा स्थितीत ती व्यक्ती सत्यप्रिय नाही हेच सिध्द होते. मग त्याच्याविषयी ही अपेक्षा ठेवणे की तो अल्लाहचा कृतज्ञ दास बनून राहील, कसे शक्य आहे? कृतघ्नता आणि सत्याचा अस्वीकार एकाच वृत्तीचे लक्षण आहे. एखादी व्यक्ती चारित्र्यहीन आहे तर त्याच्यापासून कोणतीच चांगली अपेक्षा ठेवणे गैर आहे.

**२६) एखाद्या वस्तूशी तुमचे प्रेम तुम्हाला आंधळे आणि बहिरे बनवून सोडते.**

अर्थात मनुष्याची ही फार मोठी कमजोरी आहे की तो जेव्हा कधी एखाद्या वस्तूशी प्रेम करू लागतो तेव्हा प्रेमात तो एवढा पुढे जातो की त्याला सत्य व असत्यात फरक

कळेनासा होतो. या संदर्भात तो दुसऱ्याचा उपदेश अथवा दुसऱ्याचे म्हणणेसुध्दा ऐकून घेत नाही. म्हणून प्रेमाविषयी मनुष्याला नेहमीच सतर्क राहिले पाहिजे, मग ते प्रेम पत्नीचे असो की मुलाबाळांचे असो अथवा इतर कुणाविषयीचे असोत. प्रेम जर आंधळे असेल आणि साधारणत: ते आंधळेच असते. असे आंधळे प्रेम मनुष्यापासून सत्य व असत्याचे तारतम्य हिरावून घेते व तो विवेकशून्य बनून राहातो.

**२७) आपल्यावर उपकार करणाऱ्याशी प्रेम करणे आणि आपल्याशी वाईट करणाऱ्याशी शत्रुत्व ठेवणे स्वाभाविक आहे.**

एखाद्याच्या मनाला उपकाराने आणि चांगल्या वर्तणुकीने जिंकले जाऊ शकते. असे मन सापडणे कठीण आहे जे उपकाराच्या ओझ्याखाली दबले जात नाही. याचप्रकारे एखाद्याशी वाईट वर्तणूक केल्याने त्याचा परिणाम वाईट होणारच. त्या माणसाच्या मनात आपल्याविषयी द्वेष आणि शत्रुत्व निर्माण होते. म्हणून आपल्या मनात उपकारकर्त्यावर प्रेम निर्माण होणे आणि शत्रुबद्दल मनात द्वेष आणि शत्रुत्व निर्माण होणे स्वाभाविक आहे. या सत्याला दृष्टिआड कधीही करू नये. पैगंबर (स.) यांनी या हदीसकथनाद्वारे मित्र कसा बनवावा याचे गुपित सांगितले आहे आणि लोक शत्रू कसे बनतात हेसुध्दा दाखवून दिले आहे. मित्र बनविणे चांगली गोष्ट आहे. विनाकारण एखाद्याला शत्रू बनविणे अप्रिय गोष्ट आहे.

**२८) गुन्ह्याविषयी पश्चात्ताप व्यक्त करणारा त्या माणसासारखा आहे ज्याने गुन्हा केलाच नाही.**

अर्थात एखाद्या गुन्हेगाराने आपल्या गुन्ह्यांमुळे अल्लाहच्या कृपेपासून निराश होता कामा नये. अल्लाह त्याचे सर्व गुन्हे माफ करू शकतो. अट ही आहे की त्याने मनापासून पश्चात्ताप व्यक्त करावा आणि आपल्यात सुधारणा करावी. मग तर तो अल्लाहजवळ असा बनतो जसे की त्याने कधीच गुन्हा केलेला नाही.

**२९) उपस्थित असणारा मनुष्य जे काही पाहातो त्याला गैरहजर मनुष्य पाहू शकत नाही.**

याचमुळे विश्वास त्या मनुष्याच्या साक्षीवर ठेवला जातो जो घटनास्थळी हजर होता.

**३०) जेव्हा एखाद्या लोकसमूहातील प्रौढ व्यक्ती तुमच्याकडे आली तर तिचा आदर करा.**

कोणीही आमच्याकडे आला तर त्याच्या दर्जाला आणि स्थितीला विचारात घेतले पाहिजे. इस्लामी शिष्टाचाराचा तो भाग आहे. आम्ही एखाद्याशी तसे वर्तन केले नाही ज्यासाठी तो मनुष्य हक्कदार आहे, तेव्हा आम्हाला त्याच्याशीही अपेक्षा करणे चुकीचे आहे

की आमच्याबद्दल तो चांगले विचार ठेवील. अशा स्थितीत तो आमचे आवाहन आणि श्रध्देलासुध्दा स्वीकार करणार नाही. इस्लामच्या दाई (प्रचारकाने) कधीही असे वर्तन करू नये ज्यामुळे लोकांना इस्लाम स्वीकार करण्यास अडथळा निर्माण होईल.

## ३१) खोटी शपथ राष्ट्राचा विनाश घडून आणते.

खोट्या शपथा या गोष्टीचे प्रतीक आहेत की त्यांच्या मनात ईशभय मुळीच नाही आणि दुसऱ्यांचे भले करणे, आपल्या बंधूचे भले करणे याबद्दलची कळकळ त्यांच्या मनात शिल्लक राहात नाही. जेव्हा अशी चारित्र्यहीनता एखाद्या राष्ट्राच्या नागरिकांची बनते तेव्हा त्या राष्ट्राचा विनाश अटळ बनतो.

## ३२) जो कोणी आपल्या संपत्तीसाठी मारला गेला तर तो शहीद ठरला.

अर्थात आपल्या अब्रूची आणि संपत्तीची रक्षा करता करता जर एखादा श्रध्दावंत मृत्यू पावला आणि आपल्या संपत्तीचे रक्षण करताना त्याला जीव गमवावा लागला तर तो जीव वाया गेला नाही. तर त्या मर्द मोमिनला (शूर श्रध्दावंताला) शहादत (हौतात्म्य) प्राप्त झाली. आपल्या संपत्तीच्या रक्षणासाठी लढणे आणि चोरांबरोबर लढणे अल्लाहच्या मार्गात जिहाद करण्यासारखे आहे. श्रध्दावंत आपल्या संपत्तीला अल्लाहची ठेव समजतो आणि त्याला अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी अल्लाहच्या आदेशानुसार खर्च करतो.

## ३३) चारित्र्याचा पाया संकल्पावर अवलंबून आहे.

अर्थात मनुष्याचा व्यवहार तेव्हाच पुण्यशील बनतो जेव्हा तो व्यवहार चांगल्या संकल्पावर अवलंबून असतो. जर संकल्प चांगला नसेल तर मोठे कृत्यसुध्दा व्यर्थ ठरते. श्रध्दा यालाच म्हणतात की मनुष्याने फक्त आणि फक्त अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी काम करत राहावे. एखाद्या कार्याचा उद्देश प्रसिध्दी मिळविणे अथवा इतर काही असेल तर अल्लाहजवळ हे कृत्य स्वीकृत होत नाही. हदीसमध्ये प्रसिध्दीसाठी आणि दिखाव्यासाठी काम करण्याला ईशद्रोह ठरविण्यात आले आहे.

## ३४) राष्ट्रप्रमुख राष्ट्राच्या नागरिकांचा सेवक असतो.

अर्थात राष्ट्रप्रमुखाचे हे कर्तव्य आहे की त्याने नागरिकांची सेवा करावी. प्रजेच्या कल्याणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले पाहिजेत आणि नागरिकांना सुखसुविधा दिल्या गेल्या पाहिजे. राष्ट्रप्रमुखाचे प्रयत्न यासाठीच व्हावेत की त्याची प्रजा सत्यापासून वंचित राहू नये आणि सदाचारापासून दूर राहू नये. राष्ट्रप्रमुखाचे कर्तव्य आहे की त्याने आपल्या प्रजेला सदाचारी आणि सत्यप्रिय बनवावे आणि त्यासाठी सतत प्रयत्नशील राहावे. परंतु आज पैगंबर (स.) यांच्या या अमूल्य शिकवणीला दृष्टिआड करण्यात आले आहे. परिणामत: आज शासक (राष्ट्रप्रमुख) प्रजेचा सेवक बनण्याऐवजी मालक बनून बसला आहे. तो आपल्या स्थानावरून खाली आला आहे.

**३५) उत्कृष्ट कार्य ते आहे ज्यात समतोल राखले गेले आहे.**

काम कोणतेही असो त्यात गोंधळ व गोलमाल असू नये. यामुळे अव्यवस्था निर्माण होते आणि वाईट परिणाम होतात. संतुलित कार्यप्रणाली ती कार्यप्रणाली आहे, जिला आत्मसात करून मनुष्य त्यावर निरंतर कार्यमग्न राहू शकतो आणि तेच कार्य फलदायी ठरते जे शेवटापर्यंत पार पाडले जाते.

**३६) हे अल्लाह माझ्या अनुयायींच्या हातात गुरुवारच्या दिवशी समृध्दी बहाल कर.**

या हदीसद्वारा हेच कळते की गुरूवारचा दिवस समृध्दशाली आहे आणि त्याच्या प्रारंभीचा काळ (सकाळ) खास समृध्दशाली आहे. पैगंबर मुहम्मद (स.) गुरूवारी परगावी जाण्यास पसंद करत असत.

तबुकच्या लढाईवर पैगंबर मुहम्मद (स.) गुरुवारी निघाले होते. लष्कराला ते सकाळी सकाळी रवाना करत असत. गुरुवारच्या सकाळप्रहरासाठी पैगंबरांनी अल्लाहजवळ समृध्दीसाठी प्रार्थना केली. यावरून हेच सिध्द होते की पैगंबरांची प्रकट इच्छा होती की अनुयायांनी अल्लाहच्या मार्गात बाहेर पडण्याचे कधीही थांबवू नये. प्रत्येक दिवस अल्लाहचाच आहे. परंतु काही कारणाने काही दिवसांना महत्त्व आहे. गुरुवारी सकाळी प्रवासाला निघण्याला महत्त्व आहे त्याची अनेक कारणे आहेत. त्या दिवशी दासांचे कर्म अल्लाहकडे जातात. 'पंज शुम्बा' याचा मराठीत अर्थ 'लष्कर' होतो. यासाठी हा दिवस जिहादसाठी योग्य ठरतो. तसेच एखादे नवे कार्य गुरुवारच्या दिवशी सुरु केल्याने अल्लाह त्या कार्यात समृध्दी बहाल करतो.

**३७) असे वाटते की विवशता ईशद्रोह होईल.**

परावलंबित्व आणि कंगालपणामुळे मनुष्य ईशद्रोहापर्यंत पोहचतो. कंगालपणामुळे एखाद्या मनुष्याला ईशद्रोह करणे भाग पडते यात आश्चर्याची गोष्ट नाही. दारिद्र्य, उपासमारी, कंगालपणा मनुष्याला कठीण परीक्षेत घालतात. ''अल्लाह आम्हाला अशा कठीण परीक्षेत घालू नकोस ते आमच्या श्रध्देला हानिकारक ठरेल आणि श्रध्देसाठी जे उपद्रव सिध्द होईल.'' (आमिन)

**३८) प्रवास शिक्षेचा एक भाग आहे.**

प्रवासाला जाणे आणि घरात राहाणे यात फार मोठा फरक आहे. प्रवासात ते सुखसमाधान मिळत नाही जे घरात राहून मनुष्याला प्राप्त होते. म्हणून प्रवास त्या वेळीच करावा जेव्हा गरज असते. विनाकारण प्रवास टाळावा. विनाकारण प्रवास करणे वेळेचा दुरुपयोग आहे. आपल्या प्रवासाचा हेतू साध्य झाल्यानंतर त्वरित घराकडे त्याने परतावे. हा हदीसचा खुलासा आहे.

या हदीसद्वारा हेच सिध्द होते की जेव्हा प्रवासात मनुष्याला त्रास सहन करावा लागला तर त्याने त्रस्त होऊ नये. त्याने विचार करावा की तो घरात नाही तर बाहेर प्रवासात आहे. हा विचार त्याला धीर देतो. त्याला जाणवते की प्रवासात ते सुखसमाधान त्याला कसे मिळणार जे घरात राहून त्याला मिळते. आधुनिक काळातील प्रवास जरी सुखकर झालेला आहे तरी या सत्याला आजही नाकारले जाऊ शकत नाही की प्रवास हा प्रवासच आहे.

## ३९) संमेलनासाठी विश्वस्ताची भूमिका आवश्यक आहे.

अर्थात संमेलनातील (बैठकीतील) प्रत्येक सदस्याला विश्वासपूर्ण व्यवहार करणे आवश्यक आहे. बैठकीच्या अशा कोणत्याच गोष्टीला बाहेर जाहीर होऊ देऊ नये ज्यामुळे उपद्रवाची संभावना वाढेल. बैठकीत जे घडते त्याला विश्वस्ताच्या भूमिकेत सांभाळले जावे. या बाबतीत लोकांकडून निष्काळजीपणा जास्तच होतो ज्यामुळे निरनिराळे बिघाड समाजात फैलावतात. अनेकांचे बाह्य संबंध त्यामुळे तुटतात किंवा बिघडतात. म्हणून सभाबैठकीच्या गोष्टींना विश्वस्ताच्या भूमिकेतून पाहणे लोककल्याणासाठी अत्यावश्यक आहे. यावरून हेच सिध्द होते की इस्लाम लोककल्याणाचा अत्यंत बारकाईने विचार करतो. पैगंबर (स.) यांच्या या आदेशाने हेच सिध्द होते.

## ४०) उत्कृष्ट शिदोरी ईशपरायणता आहे.

आदरणीय पैगंबर मुहम्मद (स.) यांनी कुरआनच्या प्रकाशात वरील उद्‌गार काढले आहेत. कुरआनोक्ती आहे, ‘‘ईशपरायणतेची शिदोरी बरोबर घ्या, कारण उत्कृष्ठ शिदोरी ईशपरायणता आहे.’’ प्रवासात प्रवाशाबरोबर शिदोरी असणे आवश्यक आहे. पवित्र आणि आदर्श जीवन ईशपरायणतेशिवाय शक्य नाही. ईशपरायणता ती शिदोरी आहे जी जीवनप्रवासात उपयुक्त आहे. लक्ष्यप्राप्तीनंतरसुध्दा शिदोरीचा उपयोग होतो. म्हणजे या लैकिक जीवनप्रवासात शिदोरीचा उपयोग आहेच, परंतु ही उत्कृष्ट शिदोरी पारलैकिक जीवनातसुध्दा उपयुक्त ठरते. ईशपरायणताच परलोकात मनुष्याच्या कामी येईल. ईशपरायणतेची शिदोरी परलोक यशाची निकड आहे.

**–०– समाप्त –०–**